सकाळ
गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४

# शिक्षकांनी सैनिकाप्रमाणे कष्ट करावे

## डॉ. देवळाणकर : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : 'आगामी २५ वर्षांच्या अमृतकाळात शिक्षकांनी सीमेवरील सैनिकाप्रमाणे कष्ट केल्यास भारत महासत्ता होईल. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने विवेकानंद विद्यापीठाची स्थापना करून बदलत्या शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय भूमिका घ्यावी. भारतीय ज्ञानपरंपरा आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम यामुळे आपला भारत विकसनशीलतेकडून विकसित भारताकडे जाण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे,' असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी येथे केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्राचार्य साळुंखे म्हणाले, "तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे. त्यांनी समाजाभिमुख शिक्षणावर भर द्यावा."

या कार्यक्रमाच्या प्रारंभी कला शिक्षकांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. गुणवंत विद्यार्थी आणि सुखदेव पाटील यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाला. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, पदाधिकारी, शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, श्रीराम साळुंखे, कौस्तुभ गावडे आदी उपस्थित होते.